पूरसंरक्षक योजनेच्या कामांना प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे सुधारित धोरण.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग
शासन निर्णय क्र. पूसंभि-२०१९/(प्र.क्र.११५/२०१९)/सिं.व्य.(म.)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक:- ३१ ऑगस्ट, २०१९

संदर्भ :-१) जलसंपदा विभाग, परिपत्रक क्र. एफडीडब्लू- १०८९/२४३/सिंव्य (कामे)दि.२१/९/१९८९.
२) जलसंपदा विभाग, परिपत्रक क्र. एफडीडब्लू - १०९२/१७०/ सिंव्य(कामे)दि.७/८/१९९२.
३) नियोजन विभाग, भारत सरकार परिपत्रक क्र. १६(१२)/१/९९/WR, दि.९/९/२००३
४) नियोजन विभाग, भारत सरकार परिपत्रक क्र. १६(१२)/१/९९/WR, दि.८/११/२००५.
५) जलसंपदा विभागाचा शासन निर्णय क्र. २०१७/(५६६/१७)/ सिं.व्य.(कामे)दि.३१.८.२०१८
६) शासन निर्णय क्र.२०१७/(५६६/१७) सिंव्य (कामे), दि.१९/१२/२०१७
७) शासन परिपत्रक क्र. एफडीडब्लू- १०८९/२४३/८९/सिंव्य (कामे), दि.३/५/२०१८
८) शासन परिपत्रक क्र. प्रशामा २०१६/(प्र.क्र.५५५/२०१६) सिंव्य (कामे), दि. २८/८/२०१८
९) जलसंपदा विभागाचा शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१६/(२७/१६)/ ल.पा.२दि.२६/५/२०१७

प्रस्तावना:-

नाला ट्रेनिंगची कामे व पूर संरक्षण योजनेची कामे (नाला वळविणे) या दोन्ही कामाची गल्लत केली जात असल्याचे निदर्शनास आले आहे. कोणते काम नेमके कोणी करायचे, असा संभ्रम कृषी व पाटबंधारे विभागातील क्षेत्रीय अधिकाऱ्यांमध्ये झालेला दिसतो. सर्व नाला ट्रेनिंग कामाचे सर्वेक्षण व बांधकाम पूर्णपणे कृषी विभागानेच करावयाचे आहे, हे आता स्पष्ट झाले असून याबाबत ह्या प्रकरणावर संदर्भाधीन प्रसृत केलेल्या अनुक्रमांक ३ व ४ प्रमाणे अनुक्रमे पाटबंधारे विभाग व कृषी विभागाने शासकीय आदेश काढलेले आहेतच, तेव्हा यापुढे नाला ट्रेनिंगची कामे कृषी विभागाने व पूर संरक्षणाची कामे पाटबंधारे विभागाने करावयाची आहे. नाला ट्रेनिंग व पूर संरक्षण कशाला म्हणावे या विषयी सुस्पष्ट आदेश निर्गमित करण्याची आवश्यकता आहे.

नाला ट्रेनिंग (नाला सरळीकरण) :-

नाला ट्रेनिंगचा मुख्य उद्देश शेत जमिनीचा निचरा चांगला होऊन दलदलीचे व पाणथळ क्षेत्र कमी करणे हा होय. अशी दलदल निर्माण होण्याची मुख्य दोन कारणे असू शकतात. एक म्हणजे भूपृष्ठांतर्गत काही विशिष्ट भूस्तरीय रचनेमुळे भूगर्भातील पाण्याच्या प्रवाहात अडथळा निर्माण होणे ही परिस्थिती पाटबंधारे प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात अधिक प्रकर्षाने जाणवते. लाभक्षेत्रात पाणथळ क्षेत्राचे प्रमाण कमी करण्यासाठी भूपृष्ठांतर्गत अडथळा नेमका कोठे आहे, ते ठरवून मुख्य नाल्याची ढाळ सुधारून खराब जमिनीतून भूपृष्ठांतर्गत चर खणून ते नाल्यास मिळविण्याची योजना गेली ७०-८० वर्षे पाटबंधारे संशोधन व विकास संचालनालय, पुणे यांचे मार्फत राबविली जात आहे.

लाभक्षेत्राच्या बाहेर पाणथळ क्षेत्र निर्माण होण्यास तेथील नाल्याचा सौम्य वा नदी नाल्यातील प्रवाहमार्गातील अतिक्रमण कारणीभूत होऊ शकतात. त्यामुळे नाल्याची वहनक्षमता कमी होते. पाणी दूरवर पसरते. अशा ठिकाणी नाल्याची रुंदी वाढवून वा त्यात सुधारून आजुबाजुच्या जमिनीचे संरक्षण पाण्याचा निचरा झाल्यामुळे होऊ शकते. ही कामे कृषी विभागाने करावयाची आहेत, हे स्पष्ट आहे.

पूर संरक्षणाची कामे :

पूर संरक्षणाचा उद्देश मात्र नदीत किंवा नाल्यात पावसामुळे होणारा पूर प्रवाह काठ सोडून आजूबाजूच्या परीसरात पसरतो, ज्यामुळे शेत जमीन, घरे व लोकवस्ती पाण्याखाली बुडतात, त्याच्या संरक्षणासाठी पूर संरक्षणाची कामे करणे अपेक्षित आहे. हा पूर काही तास टिकत असल्यामुळे शेतजमिनीचे सहसा काही नुकसान होत नाही. तथापी, वित्त हानी व प्राणहानी टाळण्यासाठी पूर प्रतिबंधक योजना राज्यामध्ये राबविणे जरूरीचे आहे. पूर प्रतिबंधक कामाविषयीचे सर्वेक्षण/अंदाजपत्रक जलसंपदा खात्याने करावयाचे आहे.

पूर संरक्षण योजनांच्या कामांना मान्यता देणेसंदर्भात संदर्भ -१ येथील शासन निर्णय घेतला आहे. या शासन निर्णयास २६ वर्षांपेक्षा जास्त कालावधी झालेला आहे. दरम्यानच्या काळात झालेली भाववाढ, नियोजन आयोग, भारत सरकार यांचे निर्देश, राष्ट्रीय हरित न्यायाधीकरणाने विविध न्यायालयीन प्रकरणात पूररेषा व पूर प्रवण क्षेत्रातील कामांबाबत दिलेले आदेश, याच अनुषंगाने निर्गमित केलेले शासन निर्णय, पूरसंरक्षक कामांना प्रशासकीय मान्यतेस सहमती देतांना नियोजन विभागाने नमूद केलेल्या बाबी तसेच जलसंपदा विभागास प्रशासकीय मान्यता करीता प्रदान केलेले वित्तीय अधिकार यांच्या अनुषंगाने पूरसंरक्षक कामासाठी प्रशासकीय मान्यता देण्याच्या दृष्टीने सुधारित धोरण निश्चित करवायाची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याकरीता संदर्भ-८ येथील समिती स्थापन करण्यात आली होती. त्या समितीच्या शिफारशी शासनास प्राप्त झाल्या आहेत.

उपरोक्त बाबींचा सर्वकष विचार करुन पूरसंरक्षक कामे हाती घेण्याबाबतचे सुधारित धोरण निश्चित करुन प्रशासकीय मान्यता देण्याबाबत शासन पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

<u>शासन निर्णय:-</u>

१. पूर संरक्षक कामाचा उद्देश नदीत किंवा नाल्यात पावसामुळे येणारा विसर्ग/ धरणातील विसर्ग यामुळे येणारा पूर प्रवाह काठ सोडून आजुबाजूच्या परिसरात पसरतो, त्याला अटकाव करुन संरक्षण करण्यासाठी आहे.

नदी/नाल्यातील या पूर विसर्गामुळे ज्या शेतजमिनी, घरे, रस्ते, लोकवस्ती, कारखाने, उद्योग, धार्मिक, ऐतिहासिक स्थळे पाण्याखाली बुडतात, शेत जमिनीची धूप होते. हा पूर विसर्ग काही तास टिकत असल्याने शेतजमिनीचे सहसा नुकसान होत नाही. तथापि, वित्त व प्राणहानी टाळण्यासाठी पूर प्रतिबंधक योजना राबविणे क्रमप्राप्त आहे.

२. पूरसंरक्षक कामात सर्वसाधारणत: पुढील बाबींचा समावेश असावा.

अ)नदी/ नाला काठावर माती भराव करणे, दगडी/ संधानक अस्तरिकरण करणे.

ब) संधानकातील आधार भिंत/ Retaining Wall बांधणे.

क) नदी/ नाला प्रवाहाला उचित दिशा देणे.

३. पूर संरक्षक कामाची मागणी महानगरपालिका /नगरपालिका/ ग्रामपंचायत / जिल्हा परिषद इ. स्थानिक स्वराज्य संस्था मार्फत जलसंपदा विभागाच्या कार्यकारी अभियंता यांचेकडे करण्यात यावी. (परिशिष्ट -२)

मागणी प्राप्त झाल्यावर नदी/ नाल्याच्या या भागातील पूरप्रवण क्षेत्र निश्चित करण्यासाठी शासन परिपत्रक क्र. एफडीडब्ल्यू १०८९/ प्र.क्र.२४३/८९/ सिं.व्य.(कामे) दिनांक २१/९/१९८९ व शासन परिपत्रक क्र.पूरनि-२०१८/(प्र.क्र.१८२/२०१८) /सिं.व्य.(महसूल) दिनांक ३ मे, २०१८ नुसार पूररेषा निश्चिती व आखणी मुख्य अभियंता स्तरावर झालेली आहे काय, याची पडताळणी संबधित कार्यकारी अभियंता यांनी करावी.

पूररेषा निश्चिती पूर्वीच झालेली असल्यासच पूरसंरक्षण कामाचे सविस्तर सर्वेक्षणाचे व अंदाजपत्रकाचे काम जलसंपदा विभागाने हाती घ्यावे.

पूररेषा निश्चिती झालेली नसल्यास प्रथम पूररेषा निश्चिती करुन त्याचे नकाशे निर्गमित करावे व तद्नंतर पूरसंरक्षक योजनाच्या कामाचे सर्वेक्षण व अंदाजपत्रक तयार करावे.

४. महानगरपालिका/ नगरपालिका/ ग्रामपंचायत/ जिल्हा परिषद वा इतर स्थानिक स्वराज्य संस्थाच्या कार्यक्षेत्रातील कामांची अंदाजपत्रके जलसंपदा विभागाच्या अधिका-यांनी संबधित स्थानिक स्वराज्य संस्थेच्या आयुक्त / मुख्याधिकारी / मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे संमतीपत्र घेऊन ती प्रशासकीय मान्यतेसाठी शासनास सादर करावी. (परिशिष्ट २ नुसार)

५. पूरसंरक्षक कामाचे प्रत्यक्ष बांधकाम संपल्यानंतर कामाचे पूर्णत्व प्रमाणपत्र (Work completion Certificate) प्राप्त झाल्यानंतर व निविदा शर्तीनुसार कामाचा दोष - दायित्व कालावधी (Defect Liability Period) पूर्ण झाल्यानंतर संबधित यंत्रणेला हस्तांतरित करण्यात येईल व तद्नंतर या बांधकामाची देखभाल दुरुस्ती संबधित स्थानिक स्वराज्य यंत्रणामार्फत करणेत यावी. याबाबतचे संमतीपत्र संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने मागणी पत्रासमवेत सादर करावे व ते प्रशासकीय मान्यता प्रस्तावास जोडावे. (परिशिष्ट २ नुसार)

पूर संरक्षक कामांच्या प्रशासकीय मान्यताप्राप्त अंदाजपत्रकीय रक्कमेपैकी खालीलप्रमाणे सहभागिता रक्कम / निधी (Participatory Contribution) संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने संबंधित कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळ यांचे नावे वर्ग करण्यात यावी.

“अ” वर्ग नगरपालिका २५% सहभाग.
“ब” वर्ग नगरपालिका २०% सहभाग.
“क” वर्ग नगरपालिका १५% सहभाग.
“ड” वर्ग नगरपालिका १०% सहभाग.

याबाबतचे संमतीपत्र अंदाजपत्रकासोबत जोडावे. (परिशिष्ट - २ नुसार) नागरी भागातील नगरपालिका/ नगर परिषदा/ नगरपंचायत / कटकमंडळ इ. व ग्रामीण भागातील जिल्हा परिषदा/ पंचायत समिती / ग्राम पंचायत यांना सहभागिता रक्कम / निधी (Participatory Contribution) देण्यापासून सूट देण्यात येत आहे.

तसेच यापूर्वीच्या शासन निर्णयातील १०% लोकवर्गणी व ५०% राज्यशासनाचे कर्जरुपी सहाय्य ही अट पूर्णत: वगळण्यात येत आहे.

६. सर्वेक्षण व प्रशासकीय मान्यता प्राप्त कामांचा खर्च राज्य शासनाच्या निधीतून जलसंपदा विभागामार्फत करण्यात येईल.

राज्य शासनाच्या निधीतून घ्यावयाच्या कामांना वित्तिय मर्यादा नसेल. केंद्र शासनाच्या कार्यक्रमांतर्गत काम प्रस्तावित केल्यास त्यातील निर्देशांनुसार राज्य शासन व स्थानिक स्वराज्य संस्था यांची सहभागिता बंधनकारक असेल.

आंतरराज्य नद्यांवरील पूरसंरक्षक कामे व इतर कामे केंद्र शासनाच्या निधीतून / कार्यक्रमांतून घ्यावयाचे असल्यास नियोजन विभाग, भारत सरकार परिपत्रक क्र. १६(१२)/१/९९/WR, दि.९/९/२००३ च्या वा प्रचलित निर्देशानुसार हाती घ्यावे.

७. २५ वर्षातून एकदा या वारंवारितेच्या पूर विसर्गाने बाधित होणा-या भागासाठी (म्हणजेच प्रतिबंधित क्षेत्रातील / निळया पूररेषेच्या आतील भागांसाठी) पूर संरक्षक कामे हाती घेता येतील.

८. निळया पूररेषांच्या आतील भाग हा प्रतिबंधित क्षेत्र असल्याने त्या भागात राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाच्या निर्देशानुसार नवीन बांधकामे करता येत नाहीत. (No Development Zones) तथापि, अस्तित्वातील जमिनी, लोकवस्ती घरे, रस्ते इत्यादींचे पूर्णत: स्थालांतरण वा पुनर्वसन शक्य नसल्याने पुरापासून संरक्षण मिळण्यासाठी पूरसंरक्षक कामे घेणे अनिवार्य आहेत. पूर संरक्षक कामे करतांना नदी प्रवाहात कुठलाही अडथळा येणार नाही, नदीची वहन क्षमता बदलणार नाही याची दक्षता घ्यावी.

९. पूरसंरक्षक कामे प्रस्तावित करताना नवीन तंत्रज्ञान / GIS चा विचार करावा. झालेल्या कामाचे Mapping करावे. MRSAC/ Remote sensing images / Drone survey याचाही वापर करावा. तसेच झालेल्या कामाचे GIS Mapping करावे.

१०. प्रकल्पाची व्यवहार्यता व लाभ-व्यय गुणोत्तर -

प्रस्तावित कामाचे लाभव्यय गुणोत्तर काढून व्यवहार्यता तपासावी. त्याकरिताचे परिशिष्ट-१ सोबत जोडले आहे. त्यानुसार परिगणना करावी व ते अंदाजपत्रकाचा भाग असेल. सदर परिशिष्ट संबंधित मुख्य अभियंता यांचे स्वाक्षरीसह जोडावे . काम हाती घेण्याच्या निकडीची कारणमिमांसा नमूद करण्यासाठी मुख्य अभियंता यांनी स्थळ पाहणी करुन क्षेत्रीय भेटीची टिप्पणी तयार करावी. व ती अंदाजपत्रकास जोडावी.

११. संकल्पने, तांत्रिक तपासणी, प्रशासकीय मान्यता:-

अ) संकल्पने :- पूरसंरक्षक कामाचे अंदाजपत्रक रु. ५.०० कोटी पेक्षा जास्त रक्कमेचे होणार असल्यास ते मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेकडून तयार करण्यात यावे. तसेच १.०० कोटी ते ५.०० कोटी पर्यंतच्या कामांचे सविस्तर संकल्पन महामंडळाअंतर्गत संकल्पचित्र विभागाकडून करावे. रु. १.०० कोटी रक्कमेच्या आतील कामांचे अंदाजपत्रक क्षेत्रीय स्तरावर करण्यास हरकत नाही.

ब) तांत्रिक तपासणी :- जलसंपदा विभागाचा शासन निर्णय क्र. २०१७/(५६६/१७)/ सिं.व्य. (कामे), दि. ३१.०८.२०१८ प्रमाणे पूरसंरक्षक कामाच्या प्रशासकीय मान्यतेसाठी रु. २५.०० कोटी पेक्षा कमी किंमतीचे प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती कार्यालय करीत असलेल्या छाननीप्रमाणे महामंडळ स्तरावर छाननी करुन प्रशासकीय मान्यता / सुप्रमा प्रस्ताव महामंडळाने सुस्पष्ट शिफारशीसह शासनास सादर करावे.

तसेच रु. २५.०० कोटी पेक्षा जास्त किंमतीच्या कामांना राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समिती मार्फत सविस्तर तपासणी करुन छाननी अहवालासह महामंडळाने प्रस्ताव शासनाला सादर करावेत.

क) प्रशासकीय मान्यता:- जलसंपदा विभागाचा शासन निर्णय क्र. संकिर्ण २०१६/(२७/१६)/ ल.पा. २, दि. २६.०५.२०१७ अन्वये सिंचन प्रकल्पांच्या विशेष दुरुस्ती कामांना व विस्तार व सुधारणा अंतर्गत कामांना नियोजन विभागाच्या सहमतीने प्रशासकीय मान्यता देण्याचे अधिकार जलसंपदा विभागास देण्यात आले आहेत. त्याच धर्तीवर पूर संरक्षक कामांच्या रुपये ५.०० कोटी पर्यतच्या कामांना जलसंपदा विभाग प्रशासकीय मान्यता प्रदान करेल. रु. ५.०० कोटी पेक्षा जास्त किंमतीच्या अंदाजपत्रकांना नियोजन व वित्त विभागाची सहमती अनिवार्य असेल.

१२. जलसंपदा विभागाला नेमून देण्यात आलेल्या विषय- सुचीमधील अनुक्रमांक १३ नुसार प्रशासकीय मान्यता ही जलसंपदा विभागामार्फत देण्यात येत असल्याने मुख्य लेखाशिर्ष “४७११ , पूर नियंत्रण प्रकल्पावरील भांडवली खर्च” याखाली तरतूद उपलब्धता करुन घ्यावी.

१३. हा शासन निर्णय नियोजन विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. ६३/१४३४, दि २२/४/२०१९, वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.१४९/२०१९,/व्यय-१२ दि७/६/२०१९ ग्रामविकास विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.१२/योजना-११, दि२२/४/२०१९ व नगर विकास विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.११७/नवी-२०, दि २१/५/२०१९ अन्वये देण्यात आलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

१४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१९०८३११७३०२१५६२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Atul Ashok Kapole

Digitally signed by Atul Ashok Kapole
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=797fcfe0bb4a86dd814129f50d05c1d249ea6f0acc364c6214f11ff7174bd5ef, serialNumber=ae2c4f4c985d3e984de94324901263d48766ec651dea49d652faf11a96aa98b5, cn=Atul Ashok Kapole
Date: 2019.08.31 17:36:00 +05'30'

(अ. अ. कपोले)
शासनाचे उप सचिव

प्रत,

१ मा. मुख्यमंत्री, यांचे अतिरिक्त मुख्य सचिव, मंत्रालय मुंबई.
२ मा.मंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३ मा. राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४ प्रधान सचिव (जलसंपदा) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
५ सचिव (लाक्षेवि) यांचे स्वीय सहायक, जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई,
६ अ.मु.स. वित्त विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
७ अ.मु.स. नियोजन विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
८ प्रधान सचिव, महसुल व वन विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
९ प्रधान सचिव, ग्राम विकास विभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
१० प्रधान सचिव, नगर विकास विभाग, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
११ प्रधान सचिव, कृषी व पदुम विभाग यांचे स्विय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१२ सचिव, मृद व जलसंधारण विभाग यांचे स्विय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१३ सर्व जिल्हाधिकारी,
१४ सर्व विभागीय आयुक्त,
१५ कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे
१६ कार्यकारी संचालक, महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे,
१७ कार्यकारी संचालक, तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव
१८ कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद,
१९ कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर,
२० महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक.
२१ मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व.
२२ महालेखापाल -१ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई
२३ महालेखापाल -२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२४ सर्व मुख्य अभियंता (जलसंपदा विभाग)
२५ सर्व अधीक्षक अभियंता, (जलसंपदा विभाग)
२६ आयुक्त, महानगरपालिका, सर्व.
२७ मुख्यधिकारी, नगरपरिषद / नगर पंचायत सर्व.
२८ सिं.व्य. (महसूल) निवडनस्ती

जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. पूसंभि-२०१९/(प्र.क्र.११५/२०१९)/सिं.व्य.(म.) चे सहपत्र.

परिशिष्ट :-१

१)	पुराची वारंवारता (Frequency of flood) २५ वर्षात एकदा येणार पूर विसर्ग............m३/sec
२)	पूरप्रतिबंधक कामाची अद्यावत किंमत रु.............
३)	सदर पूर प्रतिबंधक कामाऐवजी पर्यायी पुनर्वसनासाठी येणारा खर्च (तपशिलासह) रू...........
४)	तुलनात्मक तक्ता व अभिप्राय (मुख्य अभियंता यांनी प्रमाणित करावे.)
५)	लाभव्यय गुणोत्तर हे १ किंवा त्यापेक्षा जास्त असावे. लाभव्यय गुणोत्तर = पर्यायी पुनर्वसनासाठी येणारा खर्च (अ.क्र. ३) --- पूर प्रतिबंधक कामाची अद्ययावत किंमत (अ.क्र. २)
	टिप:- धार्मिक स्थळे, सांस्कृतिक वारश्याची ठिकाणे यांच्या करिताच्या पूर संरक्षक कामांना लाभ व्यय गुणोत्तर लागू होणार नाही. तथापि, या कामांच्या निकडीची कारण मिमांसा संबंधित मुख्य अभियंता यांनी त्यांच्या निरिक्षण टिप्पणीमध्ये स्पष्टपणे नमूद करावी.

****

जलसंपदा विभाग, शासन निर्णय क्र. पूसंभि-२०१९/(प्र.क्र.११५/२०१९)/सिं.व्य.(म.) चे सहपत्र.

परिशिष्ट :- २

मागणी पत्र व संमतीपत्र (स्थानिक स्वराज्य संस्थेच्या शिर्षपत्रावर)

१)	पूरसंरक्षण कामाचे नांव - --------- गावाचे नांव..... ता. --------- जि. ---
२)	स्थानिक स्वराज्य संस्थेचे नांव --------
३)	उपरोक्त पूर संरक्षक काम जलसंपदा विभागामार्फत हाती घेण्यासाठी आमच्या स्थानिक स्वराज्य संस्थेची मागणी नोंदवित आहे.
४)	प्रस्तावित कामासाठी निश्चित होणाऱ्या प्रशासकिय मान्यता अंदाजपत्रकाच्या रक्कमेच्या शासन निर्णय क्र. पूसंभि-२०१९/(प्र.क्र.११५/२०१९)/सिं.व्य.(म.), दि.३१/८/२०१९मधील तरतुदींनुसार सहभागिता रक्कम (Participatory Contribution) निविदा सूचना निर्गमित करण्यापूर्वी जलसंपदा विभागाकडे वर्ग करण्यास आमची संमती आहे.
५)	पूरसंरक्षक कामाचे प्रत्यक्ष बांधकाम संपल्यानंतर , कामाचे पूर्णत्व प्रमाणपत्र (Work Completion Certificate) कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग यांनी दिल्यानंतर व निविदा शर्तीनुसार कामाचा दोष निवारण कालावधी (Defect and Liabilities period) हे काम आमची स्थानिक स्वराज्य संस्थेस हस्तांतरित करण्यात येईल. हे काम हस्तांतरित झाल्यानंतर या कामाच्या देखभाल व दुरुस्तीची पुढील जबाबदारी आमच्या स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत करण्यात येईल.

स्थळ:- स्वाक्षरी

दिनांक:- ( )

आयुक्त/ मुख्याधिकारी/ मुख्य कार्यकारी अधिकारी.